**CNR No.MHPU060000092018**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०१/०१/२०१८ | | |
| नोंदणी दिनांक | : | ०१/०१/२०१८ | | |
| निकाल दिनांक | : | ०९/०९/२०१९ | | |
| | | वर्षे | महिने | दिवस |
| कालावधी | : | ०१ | ०८ | ०८ |

पुणे येथील सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लष्कर न्यायालय,
पुणे यांचे न्यायालयात.
(पिठासीन अधिकारी : ए. एस. देशपांडे)

नियमित फौजदारी खटला क्रं.१/२०१८. निशाणी : २९.

महाराष्ट्र शासन तर्फे, ]
वानवडी पोलीस स्टेशन, पुणे. ] ..... अभियोग पक्ष.

विरुध्द

१. मोहमद अंजुम शेख, ]
वय : ६७ वर्षे, धंदा : व्यवसाय, ]

२. इब्राहीम अंजुम शेख, ]
वय : २६ वर्षे, धंदा : --- ]
दोघेही रा. डी-०९, कल्पना इम्प्रेस-२, ]
सेंट पॅट्रीक टाऊन रोड, पुणे. ] ..... आरोपी.

**भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ५०६(२) अन्वये.**

.................................................................................................

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्षातर्फे | : | सरकारी वकील श्रीमती जे. एस. वाघमारे. |
| आरोपींतर्फे | : | ॲड. श्री. के. टी. आरु. |

.................................................................................................

# न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक : ०९/०९/२०१९)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४२०, ५०६(२) नुसार खटला चालविण्यात आला.

२. खबर देणार गणेश कृष्णा कांबळे याने दि.०७/०७/२०१६ रोजी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली कि, त्याचे भैरवनाथ मिनी मार्केट येथे गाळा नं.१९ मध्ये फ्रीज, वॉशिंग मशिन, ए.सी. रिपेअरींगचे दुकान असून दोन वर्षापुर्वी त्याने आरोपी क्रं.१ च्या घरच्या फ्रीजचे काम केल्यामुळे त्यांचा एकमेकांशी संपर्क वाढला, त्यामुळे आरोपी क्रं.१ त्यांच्या घरातील लहान मोठी रिपेअरिंगची कामे त्याला सांगायचे व त्यांच्यात चांगली मैत्री झाली होती. सन-२०१४ मध्ये एके दिवशी आरोपी क्रं.१ त्यांच्या दुकानामध्ये आले होते व तेव्हा तेथे राजेश, दिनेश सरणोपंत, कैलाश शिंदे, संतोष बनसोडे, किशोर आकुसकर असे हजर होते. त्याचवेळी आरोपी क्रं.१ त्या सर्वांसमोर बोलेले कि, ''राजेश आणि गणेश तुमच्यासाठी कॅनडा या देशात चांगली नोकरी आहे, तुम्ही तेथे जा, तुम्हाला चांगला पगार मिळेल'' व पुढे असेही म्हणाले कि, तुम्हाला प्रतयेकी चार लाख रुपये खर्च येईल व तुम्ही कामावरती हजर झाला कि तुम्हाला तुमचे भरलेले ८० टक्के पैसे परत मिळतील''. त्यानंतर आरोपी क्रं.१ म्हणाला कि, आता मी तुमच्यासाठी नोकरी शोधता व त्यासाठी मला काहीतरी पैसे लागतील असे सांगितल्यामुळे त्याने व राजेशने दि.१०/०२/२०१४ रोजी संतोष

बनसोडे यास सोबत घेऊन आरोपी क्रं.१ याला त्याच्या पत्नीच्या समोर त्याच्या घरी प्रत्येकी रुपये सहा हजार रोख स्वरुपात दिले. त्यानंतर दि.१७/०२/२०१५ रोजी त्याच्या दुकानावरती आरोपी क्रं.१ आले व त्यांनी त्याचा व राजेशचा नोकरीसाठीचा आणलेला फॉर्म त्याच्याच हस्ताक्षरात त्यांना माहिती विचारून भरुन घेतला व म्हणाला कि, ''तुम्ही आता लवकरात लवकर पैशाची जमवाजमव सुरु करा, आलेली संधी सोडू नका'' असे वारंवार सांगू लागला व पैशाची मागणी करु लागला.

३. त्यानंतर दि.१७/०३/२०१५ रोजी आरोपी क्रं.१ याने त्याला व राजेशला सीएक्यु साठी म्हणून पैशाची मागणी केली म्हणून त्याच दिवशी तो, राजेश, दिनेश सरणोपंत, कैलास शिंदे, संतोष बनसोडे असे आरोपी क्रं.१ च्या घरी गेले. त्यावेळी आरोपीच्या घरात त्याची पत्नी व मुलगी होती. त्याने व राजेशने आरोपीच्या पत्नीच्या व मुलीच्या समक्ष प्रत्येकी रु.६५,०००/- असे एकूण रक्कम रु.१,३०,०००/- आरोपी क्रं.१ यास रोख स्वरुपात दिले. त्यानंतर दि.२८/०३/२०१५ रोजी आरोपी क्रं.१ याने सीएक्यु ची एक एक झेरॉक्स प्रत आणून दिली व आता तुम्हाला पुढील प्रोसीजर एलएमओ म्हणून आहे व त्यासाठी परत पैसे द्यावे लागतील असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी दि.०७/०४/२०१५ रोजी प्रत्येकी रु.९७,०००/- असे एकूण रक्कम रु.१,९४,०००/- रोख स्वरुपात आरोपी क्रं.१ ला दिले. त्यावेळी तो आरोपीला म्हणाला कि, ''तुम्ही स्टॅम्प पेपरवरती अथवा कोठेतरी लिहून द्या आमचे पैसे घेतल्याचे व त्याबदल्यात तुम्ही आम्हाला नोकरी लावणार आहात''. परंतु आरोपी क्रगं.१ म्हणाला कि, ''माझ्यावर विश्वास नाही कि ? माझा ८० लाखांचा फ्लॅट आहे, जर काही झाले तर मी तुम्हाला माझा फ्लॅट विकून तुमचे पैसे परत करेन''. त्यानंतर

आरोपी क्रं.१ म्हणाला कि, आता तुम्हाला व्हिजा आणि विमानाचे तिकीटे येणार आहेत, परंतु त्यासाठी अगोदर तुम्हाला राहिलेले पैसे लवकरात लवकर द्यावे लागतील असे सांगितल्यामुळे दि.२०/०५/२०१५ रोजी तो, राजेश सरणोपंत, दिनेश सरणोपंत, कैलाश शिंदे, संतोष बनसोडे तसेच त्याच्या भावाजी मेव्हुणी स्नेहा पवार असे सर्वजण आरोपी क्रं.१ च्या घरी गेले होते. त्यावेळी आरोपी क्रं.१ ची पत्नी व मुलगी घरात हजर होत्या व त्यावेळी त्यांनी प्रत्येकी रु.२,०२,०००/- असे एकूण रु.४,०४,०००/- आरोपी क्रं.१ याला रोख स्वरुपात दिले होते. त्यानंतर त्यांनी आरोपी क्रं.१ यांना वारंवार कामाचे व व्हिजा आला का याबाबत विचारात होते, परंतु आरोपी क्रं.१ उडवा उडवीची उत्तरे देऊ लागले, त्यामुळे त्यांची खात्री झाली कि, आरोपी क्र.१ याने त्यांना फसवले आहे. त्यानंतर दि.२८/११/२०१५ रोजी तो, संतोष बनसोडे, स्नेहा पवार, कैलास शिंदे, दिनेश सरणोपंत असे आरोपी क्रं.१ कडे गेले व आरोपी क्रं.१ याला "आमचे पैसे परत द्या, आम्हाला नाही जायचे परदेशात" असे सांगितले असता आरोपी क्रं.२ हा त्यांनाच शिवीगाळ करु लागला व "तुमची लायकी काय आहे, तुम्ही झोपडपट्टीतील राहणारे, चला चालते व्हा, येथून तुम्हाला कोठे तक्रार करायची ते करा मी पोलीसांना घाबरत नाही, परत येथे आलात तर तुम्हाला खल्लास करुन टाकीन" असे म्हणाला तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांना घराचे बाहेर काढले. आरोपी क्रं.१ याने त्याची व राजेशची एकूण रक्कम रु.७,४०,०००/- ची फसवणूक केल्याचे त्याच्या लक्षात आल्यामुळे त्याने वानवडी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

४. सदर फिर्यादवरुन आरोपीविरुध्द वानवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रं.२९९/२०१६ भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५,

४६८, ४७१, ५०६(२) सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

५. तपासी अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्ह्याचा तपास करुन आरोपींना अटक केली. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्यानंतर वानवडी पोलीस स्टेशनतर्फे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

६. प्रस्तुत प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी त्यांच्याविरुध्द भारतीय दंड विधान कलम भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ५०६(२) सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप निशाणी-१५ प्रमाणे ठेवला. तो आरोपींना वाचून दाखविला असता त्यांनी निवेदन निशाणी-१६ व १७ प्रमाणे नाकारला आणि खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

७. अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे आणि दोषारोपपत्र यांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे विचारार्थ येतात आणि त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | : | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय कि, दि.२०/०५/२०१५ ते ०७/०७/२०१६ चे दरम्यान वेळोवेळी डी-०९, कल्पना इम्प्रेस-२, सेंट पॅट्रीक टाऊन रोड, पुणे येथे आरोपी क्रं.१ याने फिर्यादी व त्याचा मित्र राजेश या दोघांना कॅनडा येथे मोठ्या पगाराची नोकरी लावतो असे सांगून वेळोवेळी त्यांच्याकडून प्रत्येकी रु.३,७०,०००/- असे एकूण रक्कम रु.७,४०,०००/- रोख स्वरुपात घेऊन त्यांची फसवणूक केली ? | : | नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय कि, वर नमूद कालावधीमध्ये व ठिकाणी आरोपी क्रं.१ याने फिर्यादी व त्याचा मित्र राजेश यांना फसवण्याच्या उद्देशाने खोटी कागदपत्रे तयार केली ? | : | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय कि, वर नमूद कालावधीमध्ये व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व त्याचा मित्र राजेश यांना फसवण्याच्या उद्देशाने खोटी कागदपत्रे तयार केली व त्यांना फसविले ? | : | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय कि, वर नमूद कालावधीमध्ये व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व त्याचा मित्र राजेश यांना फसवण्याच्या उद्देशाने खोटी कागदपत्रे तयार केली व ती खरी आहेत असे भासवून फिर्यादीची फसवणूक केली? | : | नकारार्थी. |
| ५. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय कि, दि.२८/११/२०१५ रोजी आरोपी क्रं.२ याने फिर्यादी व साक्षीदारांना मी पोलीसांना घाबरत नाही, परत येथे आला तर तुम्हाला खल्लास करुन टाकीन अशी धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | : | नकारार्थी. |
| ६. | अंतिम आदेश काय ? | : | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

८. अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता साक्षीदार गणेश कृष्णा कांबळे - फिर्यादी (अ.सा.क्रं.१) निशाणी-२३ व साक्षीदार – राजेश पांडूरंग सरणोपंत (अ.सा.क्रं.२) निशाणी-२७ वर यांना तपासले आहे. अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींनी त्यांच्या बचावाकरीता कोणताही पुरावा दिला नाही. अभिलेखावर आरोपींविरुध्द पुरावा न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे त्यांचे बयान निशाणी-१ वरील आदेशाप्रमाणे वगळण्यात आले.

९. दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

१०. **मुद्दा क्रं.१ ते ५ करीता :-**

मुद्दा क्रं.१ ते ५ हे एकाच घटनेशी संबंधित आहेत, त्यामुळे मी त्यांचे विश्लेषण एकत्रीतपणे चर्चेने देत आहे.

११. साक्षीदार क्रं.१ - गणेश कांबळे याने त्याच्या पुराव्या दरमयान असे सांगितले कि, तो आरोपींना ओळखतो कारण तो त्यांच्या घरी फ्रीज व वॉशिंग मशिन दुरुस्त करण्याकरीता जात होता. आरोपीची समाजात बरीच ओळख असल्यामुळे त्याने त्याच्या व त्याच्या मित्राच्या कामानिमीत्त शिफारस करण्याबाबत विचारले होते. आरोपींनी त्याबाबत टाळाटाळ केली होती. नोकरी लागल्यास व्हिजा व तिकीटकरीता पैसे देण्याचे ठरले होते. शिफारस करण्यावरुन त्यांच्यात वाद झाल्यामुळे त्याने आरोपींविरुध्द तक्रार दिली होती, परंतु तक्रारीतील मजकुर त्याला माहित नाही. सदर साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास फितुर घोषीत करुन उलट तपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्यासाठी विनंती केली. परवानगी देण्यात आली असता सदर साक्षीदाराने त्याने व साक्षीदाराने आरोपींना नोकरी लावून देण्याकरीता एकूण रु.७,४०,०००/- दिल्याचे व पैसे परत मागितले असता आरोपींनी त्यांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराने आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात आरोपी क्रं.१ व त्यांच्यात तडजोडपत्र झाल्याचे मान्य केले. तसेच त्यांच्यात आपसी समझोता झाला असल्यामुळे त्याला आरोपींविरुध्द प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे मान्य केले.

१२. साक्षीदार क्रं.२ - राजेश सरणोपंत याच्या पुराव्यात असे आले आहे कि, तो आरोपींना व फिर्यादीला ओळखतो. तो त्यांच्याकडे इलेक्ट्रीकच्या दुरुस्तीकरीता जात होता. त्याने त्याच्या व फिर्यादीच्या कामानिमीत्त आरोपींना शिफारस करण्याबाबत विचारले होते. तसेच नोकरी लागल्यास व्हिजा व तिकीट काढण्याकरीता पैसे देण्याचे ठरले होते. शिफारस करण्यावरुन त्यांच्यात वाद झाल्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. सदर साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्यास फितुर घोषित करुन त्याचा उलट तपास घेतला असता त्याने व फिर्यादीने वेगवेगळया तारखांना आरोपींना नोकरी लावून देण्याकरीता पैसे दिल्याचे व पैसे परत मागितले असता आरोपींनी त्यांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराने आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांच्यात व आरोपी क्रं.१ मध्ये निशाणी-२६ प्रमाणे तडजोडपत्र झाल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांच्यात आपसी समझोता झाला असल्यामुळे प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे मान्य केले आहे.

१३. अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता आरोपीने फिर्यादी व साक्षीदाराची बनावट कागदपत्रे तयार करुन ती कागदपत्रे खरी आहेत असे भासवून फसवणूक केली व पैसे परत मागितले असता त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सिध्द करणे गरजेचे होते.

१४. फिर्यादी साक्षीदार याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने त्यांच्यात व आरोपीमध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचे नाकारले आहे तसेच साक्षीदारांनी आरोपींना नोकरी लावण्याकरीता पैसे दिल्याचे नाकारले आहे. प्रकरणात साक्षीदार व आरोपींमध्ये आपसी तडजोड

झालेली आहे. फिर्यादीचा फिर्यादी जबाब व पुरावा यामध्ये तफावत आढळून येत आहे. सबब सदर साक्षीदाराचा पुरावा विश्वासार्ह नाही.

१५. अभियोग पक्षाने आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मित्राची फसवणूक केली ही बाब साक्षी पुराव्यातुन सिध्द केली नाही. सबब आरोपीने भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ५०६(२) प्रमाणे गुन्हा केला असे म्हणता येणार नाही.

१६. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदाराचा पुरावा आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्या इतपत पुरेसा नाही, त्यामुळे आरोपींनीच सदर गुन्हा केला हे सर्व संशया पलीकडे सिध्द होत नाही. अभियोग पक्षाने भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ५०६(२) च्या घटकांची पुर्तता पुराव्याच्या माध्यमातुन केली नाही म्हणून मी मुद्दा क्रं.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

१७. मुद्दा क्रं.६ करीता :-

ज्याअर्थी मुद्दा क्रं.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी दिले आहे, त्या अनुषंगाने मुद्दा क्रं.६ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

(१) आरोपी **नामे – मोहमद अंजुम शेख व इब्राहीम अंजुम शेख** यांना भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ५०६(२) या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम २४८(१)** प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

(२) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे बंधपत्र द्यावीत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

दिनांक : ०९/०९/२०१९.
पुणे.

Sd/-XXX
(ए. एस. देशपांडे)
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. A. S. Deshpande,<br>Jt. Judicial Magistrate First Class,<br>Cantonment Court, Pune. |
| Name of the Steno | : | Shri. P. B. Jadhav. |
| Judgment Date | : | 09/09/2019. |
| Judg. signed by P.O. on | : | 09/09/2019. |
| Judgment uploaded on | : | 11/09/2019. |